# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पेठ 12 व पेठ क्र.30-32 येथील गृहप्रकल्पातील सदनिका वाटपाच्या अनुषंगाने वारंवार विचारले जाणारे प्रश्न व त्यांची उत्तरे

**1. पेठ क्र.12 येथील प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक दृष्ठ्या दुर्बल घटक(EWS) मध्ये कोणकोणत्या प्रवर्गासाठी घरे उपलब्ध आहेत ?**

उत्तर- पेठ क्र.12 आर्थिक दृष्ठ्या दुर्बल घटक(EWS) मध्ये 31 सदनिका शिल्लक असून अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाकरिता 29 सदनिका व विमुक्त जाती (DT) प्रवर्गातील 2 सदनिका शिल्लक आहेत.

**2. पेठ क्र.12 व पेठ क्र.30-32 येथील सदनिकांकरिता कोणत्या आर्थिक वर्षाचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आवश्यक आहे ?**

उत्तर- अर्जदाराचे सन 2020-21 या आर्थिक वर्षाचे सर्व मार्गाने मिळणारे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न (Gross Income) म्हणजेच दि.01/04/2020 ते दि.31/03/2021 पर्यंचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न (Gross Income) आवश्यक आहे.

| अ.क्र. | पेठ क्रमांक | सदनिका विक्रीसाठी उत्पन्न मर्यादा |
|---|---|---|
| 1 | पेठ क्र.12 (EWS) | रु.3,00,000/- पर्यंत |
| 2 | पेठ क्र.12 (LIG) | रु.3,00,001/- ते रु.6,00,000/- पर्यंत |
| 3 | पेठ क्र.30-32 (EWS) | रु.6,00,000/- पर्यंत |
| 4 | पेठ क्र.30-32 (LIG) | रु.9,00,000/- पर्यंत |

**3. पेठ क्र.12 व पेठ क्र.30-32 येथील सदनिका खरेदीकरिता अर्जासोबत किती रक्कम भरणे आवश्यक आहे. ?**

उत्तर- पेठ क्र.12 व पेठ क्र.30-32 येथील सदनिका खरेदीकरिता अर्जासोबत भरावयाची रक्कम खालील प्रमाणे

| अ.क्र. | पेठ क्रमांक | सदनिकेची विक्री किंमत (प्रति सदनिका) | फॉर्म फी | अनामत रक्कम | विक्री किंमतीच्या 10% रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पेठ क्र.12 (EWS) | रु.7,40,000/- | रु.500/- | रु.5,000/- | रु.69,000/- |
| 2 | पेठ क्र.12 (LIG) | रु.32,00,000/- | रु.1,000/- | रु.10,000/- | रु.3,10,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | पेठ क्र.30-32 (EWS) | रु.18,80,824/- | रु.500/- | रु.5,000/- | रु.1,83,000/- |
| 4 | पेठ क्र.30-32 (LIG) | रु.25,47,809/- | रु.1,000/- | रु.10,000/- | रु.2,45,000/- |

**4. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास सदनिका खरेदीसाठी पात्र होईन का ?**

उत्तर- सदनिकेचा ताबा देणेपुर्वी जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे अन्यथा जातीच्या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

**5. सोडतीमध्ये अर्जदार अयशस्वी झाल्यास कोणकोणती रक्कम अर्जदारास परत मिळू शकेल ?**

उत्तर- अर्जदार सोडतीमध्ये अयशस्वी झाल्यास अनामत रक्कम व विक्री किंमतीच्या 10% रक्कम अर्जदारास विनाव्याज परत केली जाईल, फॉर्म फी परत केली जाणार नाही.

**6. सोडतीमध्ये यशस्वी झाल्यानंतर अर्जदारास सदनिका रद्द करावयाची झाल्यास किती रक्कम कपात केली जाईल ?**

उत्तर- सोडतीमध्ये अर्जदार यशस्वी झाल्यानंतर सदनिका रद्द करावयाची झाल्यास अर्जदाराने भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अर्जदाराने ओळखपडताळणी केल्यानंतर उर्वरीत हप्ते भरल्यानंतर सदनिका रद्द करावयाची असल्यास अर्जदाराने भरलेली रक्कम अथवा सदनिकेच्या विक्री किंमतीच्या 5% रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम कपात करण्यात येईल.

**7. पेठ क्र.12 व पेठ क्र.30-32 येथील सदनिका किती वर्षाकरिता विक्री करण्यात येत आहे ?**

- पेठ क्र.12 येथील सदनिका 99 वर्षाच्या भाडेपट्ट्याने व पेठ क्र.30-32 येथील सदनिका 80 वर्षाच्या भाडेपट्ट्याने वाटप करण्यात येत आहे.

**8) PMAY चे रजिस्ट्रेशन कुठे करायचे ?**

उत्तर:- www.pmaymis.gov.in या वेबसाईटवर PMAY चे रजिस्ट्रेशन करावे लागेल . सदर वेबसाईटवर लाभार्थ्याचे रजिस्ट्रेशन न झाल्यास कार्यालयामध्ये पात्र लाभार्थ्याचे PMAY चे रजिस्ट्रेशन करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येईल.

**9) सॅम्पल फ्लॅट बघायचा आहे ?**

उत्तर:- दर रविवारी सकाळी 10.00 ते दुपारी 3.00 या कालावधीमध्ये लाभार्थ्यांना सॅम्पल फ्लॅट पहावयास उपलब्ध करून देण्याबाबतचे नियोजन करण्यात आले आहे.

**10) दुकान गाळे आणि फ्लॅट यांची मिळून सोसायटी होणार का ?**
उत्तर:- हो, एका इमारतीतील फ्लॅट व दुकाने यांची मिळुन सोसायटी स्थापना केली जाईल.

**11) दुकान गाळे कधी विकणार ?**
उत्तर:- दुकान गाळे विक्रीबाबत यथावकाश जहिरात प्रसिद्ध करण्यात येईल.

**12) महाराष्ट्रातील कुठल्याही जिल्ह्यातील रेशन कार्ड, मतदान कार्ड व इतर कागदपत्रे चालतील का ?**
उत्तर:- होय. चालतील. रेशन कार्ड, मतदान कार्ड बंधनकारक नाहीत.

**13) परिशिष्ट 1,2,3 हे अर्जदार व सहअर्जदार या दोघांनी करायचे आहे काय ?**
उत्तर:- होय. परिशिष्ट 1 येथील प्रतिज्ञापत्र अर्जदार व सह अर्जदार यांचे असणे आवश्यक, परिशिष्ट 2 येथील नमुन्यात नोकरी करीत असलेल्या पती/पत्नीचे वेतनप्रमाणपत्र, परिशिष्ट 3 येथील नमुन्यात पत्नी अथवा पती नोकरी करीत नसल्यास त्याबाबतचे स्वंय घोषणापत्र सादर करावे लागेल.

**14) पेठ क्र.12 येथील गृहप्रकल्पाचा रेरा रजिस्टर नंबर काय आहे?**
उत्तर:- P52100026449, दि. 24/09/2020

**15) जात वैधता प्रमाणपत्रा साठी जमा करायचा फॉर्म नंबर 15 वर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी कधी व कोठे मिळणार ?**
उत्तर:- लाभार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी www.bartievalidity.maharashtra.gov.in या वेबसाईटवर Form – 22 भरावा लागेल. लाभार्थी कागदपत्र तपासणीअंती पात्र ठरल्यानंतर फॉर्म 15 A वर प्राधिकरण कार्यालयामार्फत सक्षम प्राधिकाऱ्याची सही व शिक्का उपलब्ध करून दिला जाईल.

**16) उत्पन्नाच्या पुराव्यासाठी फॉर्म नंबर 16 चालेल काय ?**
उत्तर:- उत्पन्नाच्या पुराव्यासाठी वेतनप्रमाणपत्र , आयकर विवरणपत्र, तहसिलदाराकडील उत्पन्नाचा दाखला तसेच फॉर्म नं. 16 चालेल.

**17) रेशन कार्डावर कुटुंबातील इतर व्यक्तीची नावे असलेले चालेल काय ?**
उत्तर:- रेशनकार्ड बंधनकारक नाही.

**18) पत्नीच्या नावाने अर्ज भरला आहे ती काम करत नसल्यामुळे त्यासाठी पतीचा उत्पन्नाचा दाखला चालेल का ?**
उत्तर:- PMAY अंतर्गतच्या गृहप्रकल्पासाठी पती पत्नी या दोघांचे उत्पन्नाचे पुरावे देणे आवश्यक आहे. पत्नी काम करीत नसल्यास पतीचा उत्पन्नाचा दाखला व पत्नीचे परिशिष्ट 3 येथील स्वयं घोषणापत्र सादर करावे लागेल.

**19) पत्नीच्या नावाने अर्ज भरला आहे पत्नी काम करते तर फक्त पत्नीचा की पती -पत्नीचा दोघांचा उत्पन्नाचा दाखला द्यावा लागेल ?**
उत्तर:- पती पत्नी दोघांच्या उत्पन्नाचा दाखला द्यावा लागेल.

**20) नोटरीच्या ऐवजी तहसिल कार्यालयात प्रतिज्ञापत्र केले तर चालेल काय ?**
उत्तर:- होय चालेल. नोटरीसाठी 100 अथवा 200 रू. च्या स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही. ग्रीन लेजर पेपरवरील प्रतिज्ञापत्र नोटराईज्ड करून सादर करावे.

**21) वार्षिक उत्पन्न 01/04/2020 ते 31/03/2021 तसेच 01/04/2021 पर्यंतचे चालु शकेल काय?**
उत्तर:- माहितीपत्रकामध्ये सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या उत्पन्नाचा दाखला द्यावा लागेल असे नमुद आहे. तथापि 2020-21 चा उत्पन्नाचा पुरावा उपलब्ध नसल्यास 2021-22 या आर्थिक वर्षाच्या उत्पन्नाचा दाखलाही स्वीकारला जाईल.

**22) दिव्यांग लाभार्थ्यांना पहिल्या मजल्यावरील सदनिका वाटप करण्यात यावे**
उत्तर:- ज्या दिव्यांग लाभार्थ्यांना पहिल्या मजल्यावरील सदनिका हवी असेल त्यांनी कागदपत्रे तपासणीच्या वेळी पहिल्या मजल्यावरील सदनिका हवी असल्याबाबत अर्ज सादर करावा . सदनिका बदलुन देण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**23) डोमिसाईल प्रमाणपत्र बंधनकारक आहे का?**
उत्तर:- डोमिसाईल प्रमाणपत्र बंधनकारक नाही. तथापि रहिवासाच्या पुराव्यासाठी डोमिसाईल , शाळा सोडल्याचा दाखला, नोकरीच्या ठिकाणचे प्रमाणपत्र, वेतनप्रमाणपत्र, रहिवास दाखला, इ. यापैकी एखादे कागदपत्र सोबत ठेवावे

**24) लाभार्थी स्वत:च्या पसंतीच्या बँकेचे कर्ज घेऊ शकतो काय?**
उत्तर:- लाभार्थ्यांना स्वत:च्या पसंतीच्या बँकेचे कर्ज घेता येईल. कागदपत्रे तपासणीच्या ठिकाणी इच्छुक बँकांना लाभार्थ्यांना कर्जाबाबतची माहिती देण्याकरिता बँकांना सुचना देण्यात आल्या आहेत.

**25) पहिल्या अथवा इतर हप्त्याची रक्कम ठरवुन दिलेल्या रकमेपेक्षा जास्त भरता येईल काय?**
उत्तर:- होय. कागदपत्र तपासणीत लाभार्थी पात्र झाल्यानंतर लाभार्थी ठरवुन दिलेल्या हप्त्यापेक्षा जास्त अथवा 100% रक्कम एकाचवेळी जमा करू शकतात.

**26) पहिल्या प्रयत्नात कागदपत्र अपूर्ण असतील अथवा इतर कागदपत्रे मागितल्यास ते सादर करण्यासाठी आता मुदत मिळेल का?**
उत्तर:- होय. कागदपत्र अपूर्ण असतील तरअशा कागदपत्रांची पूर्तता करण्यास मुदत देण्यात येईल.

**27) इमारती क्रमांक व सदनिका क्रमांक यांचा नकाशा वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावा.**
उत्तर:- असा नकाशा वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल.

सही
**सह आयुक्त**
**जमीन व मालमत्ता(PMAY)**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**